# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.06.2026** **वारःशुक्रवार**

---

1. विधान परिषदेच्या सहा जागांवर महायुतीच्या उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित; अन्य ठिकाणी लढतीचं चित्र स्पष्ट,
2. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कारांमध्ये पुणे, नंदुरबार आणि सांगलीच्या डिजिटल उपक्रमांची निवड,
3. ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं पुण्यात निधन, आणि
4. नैऋत्य मोसमी पाऊस केरळम मध्ये दाखल, येत्या 2-3 दिवसात राज्यात पोहोचण्याचा अंदाज

**विधानपरिषद-अर्ज मागे**

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या 17 जागांसाठी तसंच एका पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल शेवटचा दिवस होता. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातल्या सहा मतदारसंघांमध्ये उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे; तर अन्य ठिकाणी निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं आहे.

पुणे मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील तसंच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सुनील टिंगरे आणि भाजपाचे प्रदीप कंद यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महायुतीचे विक्रम काकडे यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अभिजीत पवार यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे, शिवसेनेचे रविंद्र फाटक, बिनविरोध विजयी झाले आहेत.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अरविंद म्हात्रे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार बाळ माने यांनी अर्ज मागे घेतला. तसंच अपक्ष मानसी म्हात्रे आणि अनिल चोपडा यांनीही आपापले अर्ज मागे घेतले. त्यामुळे अनिकेत तटकरे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

यवतमाळ मतदारसंघातून काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी आधी माघार घेतली. तर काल भाजपाचे नितीन भुतडा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे साजीद बेग यांनीही माघार घेतल्यामुळे शिवसेनेच्या दुष्यंत चतुर्वेदी यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

चंद्रपूर वर्धा गडचिरोलीमध्ये काँग्रेसचे शैलेश अग्रवाल यांनी माघार घेतल्यामुळे भाजपाचे शैलेश लखाणी यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

अहिल्यानगरमध्ये नाट्यमय घडामोडीनंतर भाजपाचे प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. या ठिकाणी अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांनी अर्ज मागे घेतला.

सहा मतदारसंघांमध्ये बिनविरोध निवड निश्चित झाल्यानंतर आता 11 ठिकाणी 18 जून रोजी निवडणूक होणार आहे. त्या लढतीचं चित्रही स्पष्ट झालं आहे.

सोलापुरमध्ये भाजपाचे राजेंद्र राऊत आणि महाविकास आघाडीचे वसंतराव देशमुख यांच्यात लढत होणार आहे.

नाशिकमध्ये शिवसेनेचे नरेंद्र दरडे आणि अपक्ष गोकुळ गीते यांच्यात लढत होईल.

परभणी हिंगोली विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेचे सईद खान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विवेक नावंदर आणि अपक्ष सुशील देशमुख अशी तिरंगी लढत होणार आहे.

सांगली सातारा मतदारसंघात भाजपाचे धैर्यशील कदम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचन्द्र पवार पक्षाचे अभयसिंह जगताप आणि अपक्ष किशोर धुमाळ निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

जळगाव मतदारसंघात भाजपचे नंदकिशोर महाजन, शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शरद तायडे, शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे आणि अपक्ष उमेदवार अनिल चौधरी निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

छत्रपती संभाजीनगर-जालना, नांदेड, भंडारा गोंदिया, अमरावती, धाराशीव-लातूर-बीड या मतदारसंघातील निवडणुकीचं चित्रही स्पष्ट झालं आहे. तर नागपूर पोटनिवडणुकीसाठी भाजपाचे राजीव पोतदार आणि कॉंग्रेसचे अतुल लोंढे यांच्यात लढत होणार आहे.

## <u>पायाभूत सुविधा-मुख्यमंत्री</u>

'संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत सुविधांच्या निर्मिती प्रकल्पांची कामं गतीनं पूर्ण होणं गरजेचं आहे; संबंधित यंत्रणांनी प्रकल्प पूर्णत्वातील अडचणी दूर कराव्यात', असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुंबईत काल झालेल्या पायाभूत सुविधांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. विलंबाने काम पूर्ण करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील कुठलेही नवीन काम संबंधित यंत्रणेने देऊ नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंबई तसंच पुण्यातील मेट्रो प्रकल्पांचाही आढावा घेतला.

## <u>ई-गव्हर्नन्स</u>

29वे राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार काल जाहीर करण्यात आले. यात 10 सुवर्ण, 6 रौप्य आणि परीक्षकांतर्फे दिल्या जाणाऱ्या एका विशेष पुरस्काराचा समावेश आहे, असं केंद्रीय कार्मिक विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हंटलं आहे. यावर्षीच्या राष्ट्रीय विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा परिषद, पुणे महानगरपालिका आणि सांगली जिल्ह्यातील कडेपूर ग्रामपंचायत यांच्या महत्त्वपूर्ण डिजिटल उपक्रमांचा समावेश झाला आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी आणि दुर्गम भागातील नागरिकांना जलद, दर्जेदार आणि तंत्रज्ञानस्नेही आरोग्य सेवा उपलब्ध करून देणाऱ्या आरोग्य विभागाच्या 'ई-आरोग्य धमनी' या उपक्रमाला राष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात येणार आहे. तसंच नागरी प्रशासनात पारदर्शकता वाढवून महापालिकेच्या विविध सेवा नागरिकांना एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या 'पुणे 360' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचीही

राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे. तर ग्रामपंचायत डिजिटायझेशन क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सांगली जिल्ह्यातील कडेपूर ग्रामपंचायतीलाही राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. राजस्थानातील जयपूरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<u>पर्यावरण दिन</u>**

आज जागतिक पर्यावरण दिन आहे. या निमित्ताने राज्यात विविध ठिकाणी आज पर्यावरणविषयक उपक्रमांचं आयोजन केलं आहे. चंद्रपूरमध्ये 'महा-वृक्षारोपण' अभियान राबवलं जाणार आहे. तर पुणे महानगरपालिका आजपासून 'हरित पुणे, समृद्ध पुणे' हे अभियान सुरू करत आहे. या अभियानात सर्व नागरिक, संस्था आणि संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असं आवाहन आयुक्त नवल किशोर राम यांनी केलं आहे.....

**पाच जून दोन हजार सव्वीस पासून आपला पूर्ण शहरमध्ये एक व्रिक्स लागवडचं मोठं अभियान सुरू करणार आहोत आणि त्याच्यामध्ये प्रत्येक नागरिकांचा सहभाग व्हावा अशी आम्ही अपेक्षा ठेवतो आणि मी एवढेच सांगतो की जर आपल्याला काही लागवड करायची असेल तर तुम्ही खूप उत्साहाने तुम्ही याच्यामध्ये सहभागी व्हावा. तर मी आता सूचित करू इच्छितो की हा जो आपला मोहीम आहे वन महोत्सव, उपक्रम आहे त्या अंतर्गत आम्ही स्थानिक प्रजाती आहे त्याचा एक ते दीड वर्षाचे झाड जे आहे आम्ही आपल्यासाठी उपलब्ध करून देतो आणि खूप कमी पैशामध्ये छत्रपती संभाजी राजे उद्यान आहे. या ठिकाणी हे सगळे झाडे उपलब्ध असतील. आपण मोठ्या संख्येने इथे येऊन या झाडाची खरेदी करून तुम्ही आपापल्या सोयीने झाडे तुम्ही लागवड करा. मी एवढी आपल्याला विनंती करतो.**

**<u>म्हणजे</u>**

मराठी भाषा शिकण्याची इच्छा असणाऱ्यांना किंवा नव्या पिढीतील मुलांना मराठी भाषेबद्दल उत्सुकता निर्माण व्हावी, या उद्देशानं बी बिरबल डिजिटल मिडियाने 'म्हणजे?' हा छोटा पण वेगळा शब्दखेळ तयार केला आहे. www.mhanje.net या संकेतस्थळावर हा खेळ उपलब्ध आहे. याबाबत आकाशवणीला अधिक माहिती देताना बी बिरबलचे संचालक गंधार संगोराम म्हणाले.....

**भाषा आपली वाटण्यासाठी आधी भाषक आपले वाटायला हवेत असं मला वाटतं मराठी भाषेच्या प्रेमापोटी आम्ही म्हणजे नावाचा हा एक छोटासा खेळ तयार केलाय म्हणजे या खेळामध्ये भाषा शिकवण्यापेक्षा भाषेशी मैत्री करण्यावर आम्ही जास्त भर दिला आहे यात फक्त कठीण आणि पुस्तकातले अवघड शब्द नाहीत तर आपण अनेकदा ऐकलेले वापरलेले पण कदाचित नीट समजून न घेतलेले शब्द सुद्धा आहेत लहान मुलांपासून ते आजीआजोबांपर्यंत मराठी आणि अ मराठी अशा सगळ्यांसाठी हा खेळ तयार केला आहे तुम्हाला खेळ आवडला तर तो आपल्या मित्रपरिवारात आणि तुमच्या सोशल मीडियावर जरूर शेअर करा तुमच्या एका शेअरमुळे एखाद्याला नवीन शब्द सापडेल एखादी जुनी आठवण जागी होईल किंवा कदाचित मराठीशी मैत्री होईल सर्वात महत्त्वाचं म्हणजे हा खेळ सर्वांसाठी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध आहे कोणत्याही आर्थिक अपेक्षेशिवाय केवळ मराठी भाषेवर आणि भाषकांवर असलेल्या प्रेमापोटी आम्ही हा प्रयत्न केलेला आहे.**

**राजर्षि शाहू पुरस्कार**

ज्येष्ठ इतिहासकार आणि शाहू विचारांचे गाढे अभ्यासक डॉ. जयसिंगराव पवार यांना चाळीसावा राजर्षी शाहू पुरस्कार मरणोत्तर जाहीर झाला आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या 152व्या जयंती दिनी 26 जूनला हा पुरस्कार प्रदान केला जाईल अशी माहिती कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी काल दिली.

**निधन-पहलाज निहलानी**

ज्येष्ठ चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 76 वर्षांचे होते. 'हथकडी' या हिंदी चित्रपटाद्वारे निर्माते म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांनी 43 हून अधिक चित्रपटांची निर्मिती केली आहे. जानेवारी 2015मध्ये निहलानी यांची केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**निधन-थोपटे**

राज्याचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ कॉंग्रेस नेते अनंतराव थोपटे यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 93 वर्षांचे होते. भोर मतदारसंघामधून ते सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. 1972मध्ये ते प्रथम आमदार झाले. राज्याचे शिक्षणमंत्री तसंच दुग्धविकास, पशुसंवर्धन, उच्च आणि तंत्रशिक्षण, परिवहन, पुनर्वसन, रोजगार हमी, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन, विधिमंडळ कामकाज अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी 14 वर्ष मंत्रिमंडळात काम केलं.

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तसंच राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'महानंद'च्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या पार्थिव देहावर आज भोर इथं सकाळी साडेदहाच्या सुमाराला अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचं त्यांच्या निकटवर्तियांनी कळवलं आहे.

**मान्सून-आगमन**

नैऋत्य मोसमी पाऊस अर्थात मान्सूनचं काल केरळममध्ये आगमन झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली आहे. पुढील 4 ते 5 दिवस दक्षिणेकडील राज्यांच्या बऱ्याच भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**